महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार |गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक ११३ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१५५२ : मोघल सम्राट शहाजहान यांचा जन्म.
१८७४ : नोबेल पुरस्कार विजेते शरीरशास्त्रज्ञ जोसेफ एरलान्जर यांचा जन्म.
१९१३ : सुप्रसिध्द मराठी कादंबरीकार श्री.ना.पेंडसे यांचा जन्म.
१९४९ : राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एन.डी.ए.) पुणे येथे सुरु झाली.

सेन्सेक्स ८५,७६२.०१ +५७३.४१(०.६७%)
डॉलर ₹ ९०.०१

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १६ |
| दिल्ली | १७ | ०९ |
| मुंबई | ३३ | २० |
| नागपूर | २८ | १५ |
| पुणे | २९ | १३ |

**सुविचार**

प्रत्येक दिवस हा नवीन संधी घेऊन येतो, त्याचं स्वागत करा.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०६ संध्या-६:००

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,३८,५९०/- २,४१,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# इराण युद्धामागे भारताची प्रगती रोखण्याचा हेतू ?

## इराणच्या प्रतिनिधीचा अमेरिकेवर गंभीर आरोप

वृत्तसंस्था । मुंबई

**इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव वाढल्याने संपूर्ण मध्य पूर्वेतील स्थिती अस्थिर झाली आहे. यादरम्यान इराणच्या एका प्रतिनिधीने अमेरिकेवर गंभीर आरोप केले आहेत. भारत, चीन आणि रशिया असा देशांनी प्रगती करून शक्तीशाली बनू नये यासाठी अमेरिकेने हे युद्ध भडकावल्याचा आरोप त्यांनी केला आहे.**



इराणच्या सर्वोच्च नेत्याचे विशेष प्रतिनिधी अब्दुल मजीद हकीम इलाही हे एएनआयला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले की, अमेरिकाच आमच्यावर हल्ले करत आहेत आणि आमच्या नागरिकांवर बॉम्ब टाकत आहेत, आम्ही फक्त स्वतःचा बचाव करत आहोत. इराणने हे युद्ध सुरू केलेले नाही. आता या क्षणी हे युद्ध थांबावे, अशी आम्ही आशा करतो. पण हे आमच्या हातात नाही. हे अमेरिका आणि झायोनिस्ट राजवटीच्या हातात आहे. त्यांनी सुरुवात केली आहे, त्यांनीच ते थांबवायला हवे.

इलाही यांनी जरी असा दावा केला असला तरी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मात्र याच्या उलट भूमिका घेतली आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेला इराणविरोधातील युद्धात इस्रायलने वळवल्याचा दावा फेटाळून लावला आहे. त्याऐवजी इराण हा पहिल्यांदा हल्ला करण्याच्या (पान २ वर)

### ➤ युद्ध वर्चस्वासाठीच

अमेरिकेला स्वतःचे वर्चस्व कायम राखायचे आहे आणि त्यांना कोणताही भागीदार, विशेषतः शक्तिशाली देश नको आहे. अमेरिकेचे लक्ष्य हे इराण नाही, तर इराणनंतर ते इतर देशांकडे वळतील. तपासानुसार, भविष्यात भारत, चीन रशिया आणि अमेरिका हे जगातील सर्वात शक्तिशाली देश असतील. त्यामुळे अमेरिकेला कोणीही भागीदार नको आहे. भारत किंवा चीनने एक शक्तिशाली सहकारी म्हणून पुढे यावे असे त्यांना वाटत नाही. त्यामुळे, हा बदल होऊ नये आणि त्यांचे जागतिक वर्चस्व कायम राहावे यासाठी ते युद्ध भडकवत आहेत, असे इलाही म्हणाले.

# राज्यातील सर्व पाणंद रस्त्यांना मिळणार नवी ओळख

## रस्त्यांची नोंद ७/१२ उताऱ्यावर केली जाईल

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील सर्व पाणंद रस्त्यांना लवकरच स्वतंत्र ओळख मिळणार आहे. राज्यात पाणंद रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासाठी सरकारने मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार भूमी अभिलेख विभागाने पाणंद रस्ते नकाशावर दिसत असल्यास त्याची नोंद सात बारा उताऱ्यावर करण्यात येणार आहे.**

या मोहिमेबाबत रणधीर सावरकर यांनी मांडला होता. त्यावर श्वेता महाले, प्रशांत बंब, समीर कुणावर , विश्वजित कदम यांनी उपप्रश्न विचारले. नोंदणीनंतर स्वतंत्र क्रमांक देण्यात येणार असून, याची माहिती संबंधित गावाच्या ग्रामसभेत उपलब्ध करून देण्यात येईल आणि मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्त्यांची स्वतंत्र वेबसाईट सुरू करून त्यावरही माहिती टाकली जाईल, असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत जाहीर केलं.

सध्या या रस्त्यांच्या मोजणीसाठी भूमापक कमी पडत असल्याने आता खासगी भूमापक नेमून ती करण्याची योजना आखली आहे, यासाठी आवश्यक आदर्श कार्यपद्धती तयार करण्यात



आली आहे. खासगी भूमापकांनी केलेली मोजणी शासन प्रमाणित करेल, अशी माहिती देखील मंत्री बावनकुळे यांनी दिली. जे पाणंद रस्ते ज्या स्थितीत उपलब्ध आहेत त्यांना लांबी, रुंदीचे बंधन घालण्यात येणार नाही, असे किती रस्ते वर्षभरात तयार करावेत, यासाठी आमदारांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीला कोणतीही मर्यादा घातली जाणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. या रस्त्यांच्या बाबत वाद आहेत. त्यांचा निपटारा तीन महिन्यांत पूर्ण करण्यात यावा, अशा सूचना सर्व तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती देखील मंत्री बावनकुळे यांनी दिली.

**थोडक्यात**

### वडाळ्यात होळीच्या सणाला गालबोट

**मुंबई ।** धुळवडीचा जल्लोष सुरू असताना वडाळ्यात मात्र उत्साहाला गालबोट लागले. बियरची बाटली पडून फुटल्याने झालेल्या वादातून दोन गटात तुफान हाणामारी झाली. या हाणामारीत २० वर्षीय तुषार उज्जैनवाला याचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी वडाळा ट्रक टर्मिनस पोलिसांनी चार आरोपींना ताब्यात घेतले आहे.

### अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे इराणला भूकंपाचा धक्का!

**दिल्ली ।** अमेरिका-इस्रायलमधील हल्ले आणि युद्धादरम्यान, आज दुपारी इराणमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. अमेरिकन भूगर्भीय सर्वेक्षण (युएसजीएस) नुसार, दक्षिण इराणच्या गेराश प्रदेशात ४.३ तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाचे केंद्र जमिनीखाली सुमारे १० किलोमीटर होते. काही अहवालांमध्ये ही तीव्रता ४.५ इतकी असल्याचे सांगितले आहे, युद्धामुळे लोक आधीच तणावात होते अशा फार्स प्रांतात भूकंपाचे धक्के जाणवले. स्फोट आणि बॉम्बस्फोटांसह भूकंपामुळे मोठ्या प्रमाणात घबराट पसरली.

## महावितरणच्या निर्णयामुळे ग्राहकांचे १५ हजार वाचणार!

# आता फक्त ४५ हजारांत बसवा सोलर



वृत्तसंस्था । नाशिक

महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळण्यासाठी राज्य सरकारने सुरू केलेल्या स्मार्ट योजनेसाठी महावितरणने मागविलेल्या निविदेत एक किलोवॉट क्षमतेच्या छतावरील सौरऊर्जा प्रकल्पाची किंमत सुमारे ४५ हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे.

सध्या सौरऊर्जा पुरवठादार आकारत असलेल्या ६० हजार रुपये या दराच्या (पान २ वर)

### ➤ गरजूंना लाभ घेणे झाले सुकर

**महावितरणने स्मार्ट योजनेसाठी मागवलेल्या निविदेत एक किलोवॉटच्या सौरऊर्जा प्रकल्पासाठी ४५,४५० रुपये इतका कमी दर निश्चित झाल्यामुळे आता अन्य गरजू वीज ग्राहकांनाही लाभ होणार आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत सरकारी अनुदानाशिवाय ऊर्वरित रक्कम ग्राहकाला भरावी लागते. या रकमेत मोठी घट झाल्यामुळे छोट्या गरजू वीज ग्राहकांना योजनेचा लाभ घेणे अधिक सोपे होईल,**

# इराणचा पुढील सर्वोच्च नेताही इस्त्रायलच्या निशाण्यावर!

## पदभार स्वीकारण्याआधीच हत्येची धमकी

वृत्तसंस्था । जेरुसलेम

**इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला खामेनी यांच्यावर अंत्यसंस्कार देखील झालेले नाहीत, त्याआधीच इस्रायलने बुधवारी घोषणा केली की, खामेनी यांच्या जागी निवडला जाणारा त्यांचा कोणताही उत्तराधिकारी हा हत्येसाठी त्यांचे लक्ष्य असेल. इस्रायलच्या संरक्षण मंत्र्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर यासंबंधी पोस्ट केली आहे.**



इराणमध्ये खामेनी यांच्यावरील अंत्यसंस्कार हे तीन दिवस चालणार आहेत. रात्री १० वाजता (१८३० ) निष्ठावान लोक तेहरानमधील इमाम खोमेनी ग्रँड मशीद येथे भेट देऊन देशाच्या शहीद मार्गदर्शकाच्या पार्थिवाला अखेरची निरोप देऊ शकतील, अशी माहिती इस्लामिक डेव्हलपमेंट को-ऑर्डिनेशन कौन्सिलच्या निवेदनाचा हवाल्याने दिली आहे. खामेनी यांचे पार्थिव ईशान्य इराणमधील त्यांचे मूळ शहर असलेल्या मशहदमध्ये दफन केले जाईल. आयातुल्ला खामेनी यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांचे पुत्र मोजतबा खामेनी यांची निवड करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. यादरम्यान इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी बुधवारी खामेनी यांचा उत्तराधिकारी म्हणून निवडल्या जाणाऱ्या कोणत्याही इराणी नेत्याची ते हत्या करतील, अशी धमकी दिली आहे.इस्रायलचा विनाश करण्याच्या योजनेचे नेतृत्व करण्यासाठी इराणच्या दहशतवादी (पान २ वर)

### खोमनींचा पुत्रच वारसदार

**खामेनी यांच्या हत्येनंतर त्यांची जागा कोण घेणार? याबद्दल वेगवेगळ्या चर्चा सुरू असतानाच मंगळवारी रात्री उशिरा आयातुल्ला खामेनी यांचे पुत्र मोजतबा यांना उत्तराधिकारी म्हणून निवडण्यात आले. हे वृत्त इस्रायली मीडियाकडून देण्यात आले. त्यानंतर ही धमकी देण्यात आली आहे. 'पंतप्रधानांनी आणि मी 'ऑपरेशन लायन्स रोअर'च्या उद्दिष्टांचाच एक अविभाज्य भाग म्हणून हे मिशन पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व मार्गांनी तयारी आणि कृती करण्याचे निर्देश आयडीएफला दिले आहेत', असे इस्रायली संरक्षण मंत्र्यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.**

## प्लास्टिक बंदी केवळ नावापुरती

# धुळवडीसाठी प्लास्टिकच्या पिशव्या, फुग्यांचा वापर

प्रतिनिधी । जळगाव

**एकल प्लास्टिक वापरावर बंदी असतानाही बाजारात जागोजागी प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे निदर्शनास येत आहे. अनेक दुकानदार, फेरीवाले तसेच ग्राहक सर्रास प्लास्टिक पिशव्यांचा वापर करीत असल्याने महानगरपालिका प्रशासनाने प्लास्टिकविरोधातील कारवाई थंडावली का? असा सवाल पर्यावरणप्रेमींकडून उपस्थित केला जात आहे.**

### पर्यावरणप्रेमींकडून संताप व्यक्त




महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व महापालिका प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा फटका पर्यावरणाला बसत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

धुलीवंदनाच्या दिवशीही अनेक ठिकाणी प्लास्टिकच्या पिशव्या, फुग्यांचा वापर करण्यात आल्याचे निदर्शनास आले. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र प्लास्टिक व थर्मोकोल (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी व साठवणूक) अधिसूचना २०१८ नुसार एकल वापराच्या प्लास्टिक वस्तू उत्पादन, वापर, वाहतूक, वितरण, घाऊक आणि किरकोळ विक्री आणि साठवणूक यावर बंदी आहे. तसेच, केंद्र शासनाने 'सिंगल यूज प्लास्टिक अधिसूचना २०२१फनुसारही प्लास्टिक वस्तुंचे उत्पादन, उपयोग, विक्री, वाहतूक, हाताळणी व साठवण प्रतिबंधित आहेत. जळगाव महापालिका प्रशासनाने ऑगस्ट २०२३ मध्ये पर्यावरण विभागाच्या सूचनेनुसार प्लास्टिकविरोधातील कारवाई तीव्र केली होती. त्यांनतर काही महिन्यातच बाजारात पुन्हा प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर वाढला. अद्यापही प्लास्टिकविरोधातील कारवाईची कठोर अंमलबजावणी झाली नसल्याने धुळवडीच्या दिवशी निदर्शनास आले. धुळवडीच्या दिवशी (पान २ वर)

### पी.व्ही.सिंधू सुखरुप मायदेशी परतली

वृत्तसंस्था । दुबई

भारताची अव्वल बॅडमिंटनपटू पी.व्ही.सिंधू युद्धजन्य परिस्थितीतून मायदेशी सुखरुप परतली आहे. इंग्लंडमध्ये आयोजित ऑल इंग्लंड बॅडमिंटन या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ती निघाली होती मात्र दुबईत असताना परिस्थिती चिघळल्याने ती तिथेच अडकली. शनिवार संध्याकाळपासून सिंधू दुबईतच अडकली होती.

# आखाती देशांमध्ये अडकलेल्या लोकांना लवकरच परत आणू

प्रतिनिधी । मुंबई

**इराण आणि इस्रायलमध्ये जे युद्ध सुरु झालं आहे, ज्यानंतर अनेक भारतीय आखाती देशांमध्ये अडकले आहेत. महाराष्ट्रातल्या पर्यटकांना आम्ही सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहोत, गिरीश महाजन यांना यासंदर्भातली जबाबदारी दिली आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.**



देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत ही माहिती दिली. इराण आणि इस्रायल यांचं जे युद्ध सुरु झालं त्यानंतर एअर स्पेस बंद झाली. त्यानंतर भारतीय पर्यटक किंवा व्यवसायासाठी जे लोक गेले त्यांचे मेसेज आपल्याला येऊ लागले. त्यानंतर आपण केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क केला. त्यांनी दुतावासाशी संपर्क करायला सांगितलं. आपल्या राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री आहेत गिरीश महाजन यांना आपण ती जबाबदारी दिली आहे. (पान २ वर)

# आखाती देशातील युद्धामुळं पेट्रोल-डिझेल महागणार?

## भारताच्या मदतीसाठी रशियासारखा मित्र पुढे सरसावला

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्धामुळे भारतातील पेट्रोल-डिझेलच्या किमती भडकण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सध्या भारतातील तेल कंपन्यांकडे पुढील काही आठवड्यासाठीचा पुरवठा असल्याची माहिती समोर आली आहे.**




इराण, इराक, सौदी अरेबिया, अबुधाबी, कुवेत, कतार या देशांमधून मोठ्या प्रमाणात तेलाची निर्यात केली जाते. मात्र या आखाती देशांत युद्धजन्य परिस्थिती असल्यामुळे तेलाच्या निर्यातीमध्ये खंड पडला आहे. अशा परिस्थितीत भारताच्या मदतीसाठी रशियासारखा जुना मित्र धावून आला आहे. जर युद्धामुळे तेलाच्या पुरवठ्यामध्ये खंड पडल्यास रशिया भारताला इंधन पुरवठा करेल, असे वृत्त रॉयटर्सने रशियन सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे.पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे जगभरातील ऊर्जा क्षेत्रात गोंधळ उडाला आहे. जगातील सुमारे २० टक्के तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होते. (पान २ वर)

### ● रशियाचा पर्याय

रशियाने भारताला अतिरिक्त ऊर्जा पुरवठा करण्यासंबंधी सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.पश्चिम आशियातील पुरवठादारांकडून संभाव्य कमतरता भासल्यास ती रशियाकडून कच्चे तेल आयात करून भरून काढली जाईल. अमेरिकेबरोबरच्या व्यापार करारामुळे भारताने रशियन तेलाची आयात कमी करण्यास होकार दिला होता. मात्र युद्धजन्यस्थितीमुळे रशिया मदतीसाठी पुढे आला आहे.

# २ हजार ५०० पशुवैद्यक; ४ हजार पशुधन पर्यवेक्षक १० मार्चला देणार सामूहिक राजीनामे?

वृत्तसंस्था । मुंबई



**राज्यातील शासकीय पशु रुग्णालयातील वैद्यकीय सेवा पूर्णपणे कोलमडून शेतकऱ्यांवर नवं संकट उभं राहण्याची शक्यता आहे.**

सुमारे अडीच हजार शासकीय पशुवैद्यक आणि ४ हजार पशुधन पर्यवेक्षक १० मार्च रोजी सामूहिक राजीनामे देण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांना आणखी एका नव्या अडचणीला सामोरी जावे लागेल.

महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटना यांनी पशुसंवर्धन विभागाच्या धोरणांविरोधात राज्यव्यापी आंदोलन सुरू केले आहे. अत्यल्प मनुष्यबळ असताना एक एक पशुवैद्यकावर अनेक गावांचा कारभार सोपवण्यात आलं असून आधीच कामाच्या ओझ्याखाली दबलेल्या पशुवैद्यकांना (पान २ वर)

शौर्य मराठी
महाराष्ट्राचे निडर दैनिक
epaper.shauryamarathi.com



## संपादकीय

### आरटीईची नियमावली वादाच्या भोवऱ्यात

शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाच्या धोरणाच्या नियमावलीनुसार विद्यार्थ्यांच्या घराजवळचे १ किलोमीटर अंतरातील शाळाच विद्यार्थ्यांना निवडता येईल, ही नवी तरतूद शिक्षण हक्क कायद्याच्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासणारी आहे. ही तरतूद म्हणजे शिक्षण हक्क कायदा रद्द करण्याचे धोरण आहे. त्याचप्रमाणे श्रीमंत शाळांच्या दबावाला राज्य शासन बळी पडले आहे, असे वाटते. आपल्या राज्यघटनेतील बंधुत्वाचे उद्दिष्ट तेव्हाच साध्य होऊ शकते जेव्हा एखादा गरीब विद्यार्थी करोडपती किंवा मुख्यमंत्र्याच्या विद्यार्थ्याच्या शेजारी बसून शिक्षण घेतो. जेव्हा दोघे शाळेत, महाविद्यालयात एकत्र खेळतात तेव्हा हे साध्य होऊ शकते. शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाची तरतूद सामाजिक विषमता संपवण्यासाठी आणि सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी एक ध्येय म्हणून राबवली पाहिजे, असे प्रतिपादन उपरोक्त शब्दांत नुकतेच सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींनी व्यक्त केले. त्यानंतर महाराष्ट्रात शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाच्या धोरणाबाबत नवी नियमावली नुकतीच जाहीर करण्यात आली, हा एक दुर्दैवी योगायोग आहे. राज्यातील ८६५० स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित खासगी शाळांमध्ये एकूण १ लाख १२ हजार ७०६ जागांसाठी ही नियमावली वादात सापडली आहे. या तरतुदीप्रमाणे फक्त १ किलोमीटर अंतरातील शाळाच विद्यार्थ्यांना निवडता येणार आहे. अशा प्रकारचे १ किलोमीटरचे बंधन टाकणे ही तरतूद मूळ कायद्यांशी, तत्त्वाशी विसंगत आहे. शिक्षण हक्क कायद्यात ही तरतूद येण्याची काही कारणे आहेत. काही देशांत एज्युकेशन व्हाउचर विद्यार्थ्यांना दिले जाते. सरकार एका विद्यार्थ्यांवर जितकी रक्कम खर्च करते, ती रक्कम शाळांना देण्यापेक्षा पालकांच्या हातात कूपन स्वरूपात द्यायची व पालकांनी त्यांना पाहिजे त्या शाळेमध्ये प्रवेश घ्यावा, अशी कल्पना राबवली गेली. ती प्रायोगिक तत्त्वावर भारतात कशी राबवावी, याबाबत अनेकदा चर्चा झाल्या. दिल्लीत सेंटर फॉर सिव्हिल सोसायटी ही संस्था या कल्पनेच्या प्रसारासाठी अनेक वर्षे काम करते. त्यांनी दिल्लीतील काही शाळांमध्ये अशा प्रकारचे कूपन वाटपही केले होते. अकराव्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाने याविषयी प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करण्याची सूचनाही केलेली होती. जर श्रीमंतांना हवी ती शाळा निवडता येते तर गरीब, वंचितांनाही ती संधी असली पाहिजे, हे या कायद्यातील मुख्य तत्त्व आहे. गरीब विद्यार्थ्यांना सरकारी शाळांमध्येच शिक्षण घेण्याची सक्ती नको. कोणतीही चांगली शाळा तळागाळातील पालकांना निवडता आली पाहिजे, हे या कायद्यातील प्रमुख तत्त्व या योजनेत डावलले जाणार आहे. दुसरी भूमिका अशी होती, की आज श्रीमंतांच्या शाळा आणि गरिबांच्या शाळा अशी विभागणी शालेय शिक्षणात निर्माण झाली आहे. कोठारी आयोगाने गरीब व श्रीमंत विद्यार्थ्यांनी एकाच शाळेत शिकावे, अशी भूमिका मांडली. कोणत्याही सरकारांना ते करता आले नाही. मोठ्या प्रमाणात खासगी शाळांना परवानगी दिल्याने व आर्थिक स्तराप्रमाणे शाळांचे वर्गीकरण झाल्याने शालेय शिक्षणातच सामाजिक विषमतेची बीज रोवले गेले. श्रीमंतांसाठी खासगी शाळा व गरिबांसाठी सरकारी शाळा असे समीकरण दृढ झाले. तीच विषमता पुढे समाजात प्रतिबिंबित झाली.

# दरोडा टाकून पलायन करणाऱ्या लुटारूंना केले जेरबंद

## शिरपूर तालुका- शहर पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून ठोकल्या बेड्या

प्रतिनिधी । शिरपूर

**मध्य प्रदेशातील अगरबत्ती बनवणाऱ्या कारखान्यातील कर्मचाऱ्यांना मारहाण करून हातपाय बांधून दरोडा टाकून पलायन करणाऱ्या लुटारूंना मध्य प्रदेश पोलिसांच्या सूचनेवरून शिरपूर पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून ५ जणांना अटक केली असून १९लाख १२ हजारांचा मुद्दे माल हस्तगत केला आहे. या कारवाईत सावळदे कुरखडी दहिवद व थाळनेर येथील गावकऱ्यांनी मोठी मदत केली आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी, दि. ३ मार्च रोजी सकाळी ७.३० वाजे सुमारास सेंधवा ग्रामीण पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी शिरपूर तालुका व शिरपूर शहर पोलीसांनी संयुक्तपणे सेंधवा ग्रामिण पोलीस ठाणे हददीत फ्लोअर इंडस्ट्रीज, सेंधवा अगरबत्ती व सुगंधी द्रव्य बनविण्याचा कारखाना येथे पहाटे ३ ते ४ वाजेच्या दरम्यान ५ ते ७ इसमांनी कंपनीत अनधिकृतरित्या प्रवेश करुन तेथील वॉचमन व ०५ मजुरांना हाताबुक्क्यांनी मारहाण करुन बळजबरीने कंपनीतील कामगारांकडुन अंदाजे १,००,०००/- रुपये रोख ०३ मोबाईल फोन तसेच १० लाख रुपये किंमतीची ग्रे रंगाची सियाझ कार क्रमांक चझ १३ नठ ८५१० ही हिसकावुन नेल्याबाबत सेंधवा ग्रामिण पोलीस स्टेशनला तक्रार आली असुन त्यांनी सदरची चोरी करण्यासाठी लाल रंगाची मारुती स्वीप्ट कार वापरली आहे व सदरच्या दोन्ही कार हया शिरपूरच्या दिशेने येत असल्याबाबत पोलीस निरीक्षक शिरपूर तालुका व पोलीस निरीक्षक शिरपूर शहर यांना कळविले. शिरपूर तालुका पोलीस स्टेशनेचे पोलीस निरीक्षक श्री जयपाल हिरे व शिरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री किशोरकुमार परदेशी यांनी आपापल्या हददीत बोराडी गाव, वाघाडी टी पॉईट, शिरपूर टोल नाका याठिकाणी नाकाबंदी लावली असता शिरपूर तालुका पोलीस ठाणे यांचे पथकाने नाकाबंदी दरम्यान पाठलाग करुन आरोपी नामे फिरोज कचरु सैयद वय-२९ रा कासुर्डी ता दौंड जि पुणे यास मारुती सुझुकी सियाझ वाहन क्र चझ १३ नठ ८५१० (किंमत अंदाजे १०,००,००० /- रुपये) सह ताब्यात घेतले व इतर चार ते पाच आरोपी हे लाल रंगाच्या स्विप्ट कारने शिरपूर दिशेकडे पळुन गेले बाबत शिरपूर शहर पोलीसांनी कळविले. त्यानंतर शिरपूर शहरातील वाघाडी टी पॉईंट व शिरपूर टोल नाका येथे नाकाबंदी करीता उभे असतांना लाल रंगाचे स्विप्ट कार ही वाघाडी टी पॉईट जवळ येत असतांना आरोपींना पोलीसांची नाकाबंदी असल्याचे दिसल्याने त्यांनी लाल रंगाची स्वीफ्ट कार ही भरधाव वेगाने काढुन करवंद नाका - गुजराती कॉम्प्लेक्स अमोदे गाव शिरपूर फाटा चोपडा फाटा थाळनेर मांजरोद कुरखळी मार्गाने त्यांचे वाहन पळवून नेत असतांना पोलीस पाठलाग करीत असल्याचे त्यांचे लक्षात आल्याने आरोपींची गाडी जाईल त्या दिशेच्या पुढील गावांना शोध पथक कळवित होते. आरोपींनी त्यांचे वाहन हे सावळदे गावातुन तापी नदी किनाऱ्याचे रस्त्याने पळवुन नेऊन सावळदे गावाजवळ तापी नदीचे किनारी लाल रंगाचे वाहन सोडुन आरोपींनी नदी काठाने पळ काढला. परंतु, शिरपूर शहर पोलीस ठाणेचे शोध पथकाचे अंमलदार व पूर्व सुचना देऊन मदतीसाठी उभे असलेले श्रीसचिनसिंग राजपुत (सरपंच सावळदे), श्री मुकेश धनगर (सरपंच कुरखळी), मयुर राजपुत रा दहीवद, आबा कोळी रा थाळनेर व सावळदे गावातील गावातील ग्रामस्थ यांचे मदतीने ०४ आरोपी यांचा पाठलाग करुन त्यांना शिताफिने पकडले. विशाल अनिल दामोदरे वय-२६ रा वरवंड, ता दौंड जि पुणे २) रमेश बापु करडे वय ५२ रा केळगाव, मारुती मंदीराजवळ, ता दौंड, जि पुणे ३) श्याम तानाजी साळुंखे वय-२९ रा गोलीवस्तीरोड हडपसर जि पुणे ४) संतोष आण्णा शिवरकर वय-३० रा बोरीपारधी, ता दौंड जि पुणे असे इसम मिळुन आल्याने त्यांची व त्यांचे वाहनाची तपासणी केली असता त्यात खालीलप्रमाणे मुददेमाल मिळुन आला.५ लाख रुपये किंमतीची लाल रंगाची मारुती स्वीप्ट कार यासह ९ लाख १२ हजार रुपये किंमतीचा मुदेमाल मिळुन आला आहे. सेंधवा ग्रामिण पोलीस ठाणे, मध्यप्रदेश हददीत घडलेल्या दरोडयाच्या घटनेतील पाचही आरोपी शिताफिने पकडुन व एकुण १९,१२,००० /- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करुन उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



# मुक्ताईनगरला नूतन कार्यालयाची जिल्हा मुद्रांक अधिकाऱ्यांकडून पाहणी

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**सह दुय्यम निबंधक खरेदी विक्री यांचे कार्यालय तहसीलच्या आवारात नवीन प्रशस्त, फर्निचरयुक्त, रंगकाम केलेले, जनतेसाठी सोयीसुविधायुक्त असे बांधण्यात आलेले आहे. या इमारतीची सह जिल्हा निबंधक वर्ग १ खरेदी-विक्री तथा जिल्हा मुद्रांक अधिकारी यांनी मुक्ताईनगरला येऊन पाहणी केली आहे.**



मुक्ताईनगर तहसील कार्यालयाच्या इमारती शेजारीच या आधी एकाच खोलीत दुय्यम निबंधक कार्यालय अनेक वर्षापासून सुरू होते. तेथे खरेदी विक्री करण्याच्या कामकाजाच्या दृष्टीने दिवसभर गर्दी असायची.लोकांना वाहने लावणे, काही तास थांबण्याच्या दृष्टीने गैरसोयीचे होते. त्यामुळे शासकीय निधीतून तहसीलच्याच आवारात एका बाजूला प्रशस्त नवी इमारत बांधण्यात आलेली आहे. काही किरकोळ कामे अंतिम टप्प्यात आहेत. सह जिल्हा निबंधक वर्ग एक खरेदी-विक्री तथा मुद्रांक जिल्हाधिकारी मंदार कुलकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांनी या नव्या वास्तूची पाहणी करून काही सूचना केल्या व समाधान व्यक्त केले. येथील सह दुय्यम निबंधक अधिकारी शुभम बावके यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सदर कार्यालयाच्या नवीन प्रशस्त इमारतीच्या शेजारीच मुद्रांक विक्रेत्यांना बसण्यासाठी जागा देऊन शेड उभारण्यात यावे तसेच मुख्य रस्त्यावर संरक्षक भिंतीला कार्यालयाच्या इमारतीसमोर लोकांना ये- जा करण्यासाठी स्वतंत्र छोटे प्रवेशद्वार बांधण्यात यावे आदी मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी मुद्रांक विक्रेते मोहन मेढे, किशोर मेढे, सुनील सोनार, प्रकाश सोनार, श्री.डांगे, विजय साळुंके, विनोद सुरवाडे आदी उपस्थित होते.

# हातबारीपाड्यात तीव्र पाणीटंचाई

प्रतिनिधी । नंदुरबार

तळोदा येथील ऐतिहासिक रावलापाणी शहीद स्थळाकडे जाणाऱ्या मार्गावरील हातबारीपाडा (ग्रा. सावरपाडा) येथे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर आज युवा क्रांती, नंदुरबारच्या वतीने जिल्हा परिषद नंदुरबार येथे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष ॲड.रुपसिंग वसावे यांनी स्वतः उपस्थित राहून संबंधित अधिकाऱ्यांकडे तातडीने कायमस्वरूपी पाणीपुरवठा व्यवस्था करण्याची ठाम मागणी केली. २ मार्च १९४३ रोजी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढणाऱ्या आदिवासी सत्याग्रहींच्या बलिदानाने पावन झालेल्या रावलापाणी येथे दरवर्षी हजारो नागरिक शहीदांना अभिवादन करण्यासाठी येतात. मात्र या स्थळाकडे जाणाऱ्या मार्गावरील हातबारीपाड्यात सुमारे २०० ते २५० लोकवस्ती असूनही कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना उपलब्ध नसल्याची गंभीर बाब निवेदनात नमूद करण्यात आली आहे. सदर पाड्यात केवळ एक हातपंप असून त्यातून अत्यल्प प्रमाणात पाणी मिळते. त्यामुळे ग्रामस्थांना निझरा नदीच्या वाळूत कुवा करून झिरपणारे पाणी पिण्यासाठी वापरावे लागत आहे. ही परिस्थिती आरोग्यास धोकादायक असून महिलां, लहान मुले व वृद्धांना दररोज मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याचे ॲड.रुपसिंग वसावे यांनी सांगितले. नवीन बोरवेल मंजूर करून तातडीने कार्यान्वित करणे आदी मागण्या करण्यात आल्या. दरम्यान, येत्या सात दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास दि. ११ रोजी तळोदा येथील अंकलेश्वर-बुरहानपूर महामार्गावरील चिनोदा चौफुली येथे लोकशाही मार्गाने रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा प्रदेशाध्यक्ष ॲड. रुपसिंग वसावे यांनी दिला आहे.

## पान १ वरुन

### इराण युद्धामागे भारताची.....

तयारीत होता आणि त्यामुळे अमेरिकेने या धोक्यापासून सुरक्षित राहण्यासाठी आधी पावले उचलली असे म्हटले आहे.इलाही यांनी असाही आरोप केला की, भारत, चीन आणि रशिया यासारखे शक्तीशाली देश उभे राहू नयेत म्हणून अमेरिका संघर्ष निर्माण करत आहे.

### आता फक्त ४५ हजारांत......

तुलनेत नवा दर १५ हजार रुपये कमी असल्याने योजनेच्या लाभार्थी पाच लाख छोट्या ग्राहकांची खूप मोठी बचत होणार आहे. तसेच साठ हजारच्या ऐवजी ४५ हजार रुपयात एक किलोवॉटचा छतावरील सौरऊर्जा बसविता येत असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे आगामी काळात असे प्रकल्प बसविणाऱ्या सर्व गरजू ग्राहकांना लाभ होणार आहे.

राज्य सरकारच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार (स्मार्ट) योजनेच्या शासननिर्णयात प्रतिकिलोवॉट ५० हजार रुपये खर्च गृहित धरला आहे. सध्या व्यवहारात सोलर पुरवठादार व्यावसायिक ग्राहकांकडून प्रती किलोवॉट सुमारे ६० हजार रुपये आकारतात. पण महावितरणने मंजूर केलेल्या निविदेत प्रती किलोवॉट ४५,४५० रुपये इतकी रक्कम स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे या योजनेत ग्राहकाने भरायच्या हिश्श्याच्या रकमेत आता मोठी कपात होईल.

### इराणचा पुढील सर्वोच्च .....

राजवटीद्वारे निवडलेला कोणताही नेता, जो अमेरिकेला, मुक्त जगाला आणि या प्रदेशातील देशांना धमकावेल आणि इराणी जनतेवर दडपशाही करेल, तो हत्येचे निश्चित असे लक्ष्य असेल, मग त्याचे नाव काहीही असो किंवा तो कुठेही लपलेला असो', असे काट्झ यांनी एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

### प्लास्टिक बंदी केवळ......

मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या आणि फुग्यांचा, तसेच रंगांच्या वेष्टनासाठी प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला. दरम्यान, किराणा दुकाने, भाजी मंडई, फेरीवाल्यांकडून सर्रास प्लास्टिक पिशव्यांचा वापर करण्यात येत आहे. अनेकदा ग्राहकांच प्लास्टिकच्या पिशव्यांची मागणी करतात. त्यामुळे दुकानदार, फेरीवाल्यांसह नागरिकांनाही महापालिकेच्या कारवाईचा धाक राहिलेला नाही. मुळात पालिकेमार्फत या प्रकरणी कारवाईच होत नसल्याने बाजारात प्लास्टिकचा वापर वाढल्याचे पर्यावरणप्रेमींचे मत आहे. तसेच, नागरिकांमध्येही प्लास्टिकच्या दुष्परिणामांबाबत जनजागृतीचा अभाव असल्याचे स्पष्ट होत असून प्लास्टिकचे मोठे आव्हान महानगरपालिका प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळापुढे आहे. गेल्या ३ ते ४ वर्षापासून प्रशासकराज होते. परंतु आता पदाधिकारी सत्तेवर बसल्याने महापौरांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

### २ हजार ५०० पशुवैद्यक ......

रात्री उशिरा ही तात्काळ सेवा देण्याची अपेक्षा पशुसंवर्धन विभाग ठेवत असल्याचा आरोप राजपत्रित पशुवैद्यक संघटनेने केला आहे. या कारणामुळे २५०० शासकीय पशुवैद्यक आणि ४००० पशुधन पर्यवेक्षक काम बंद आंदोलन आणि त्यानंतर सामूहिक राजीनामे देणार आहे.

### आखाती देशांमध्ये......

आपण नंबर दिला आहे, तिथल्या लोकांच्या अडचणी आपण दूर करतो आहोत. अडकलेल्या लोकांना परत आणण्याचे प्रयत्नही आपण सुरु केले आहेत अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, एअर इंडियाची विमानं आता हळूहळू जात आहेत आणि लोकांना परत आणत आहेत. काही एअर स्पेसेस सुरु आहेत काही बंद आहेत. जिथून आणता येणं शक्य आहे तिथून आणलं जातं आहे. कुवेतमध्ये हा प्रश्न निर्माण झाला होता कारण ट्रांझिटचे लोक तिथे आहेत, त्यांच्याकडे व्हिसा नसल्याने अडचणी होत्या. पण आता प्रयत्नपूर्वक त्यांना एका ठिकाणी थांबवलं आहे. मराठी मंडळं, इतर मंडळांना आपण ॲक्टिव्हेट केलं आहे. तिथल्या मराठी लोकांना आपण मदत करत आहोत. गिरीश महाजन यांनी अनेकांना व्हिडीओ कॉलही केले आहेत. आपले जे चीफ ऑफ प्रोटोकॉल आहेत त्यांनाही आपण जबाबदारी दिली होती. आपल्या दुतावासाची बैठक घेऊन तिथल्या नागरिकांना दिल्या आहेत. दोनदा आपण लोकांना काय करायचं आणि काय करु नये ते सांगितलं आहे.

### आखाती देशातील......

मात्र युद्धामुळे तेल वाहतूक करणारी जहाजे हा जलमार्ग टाळत आहेत. त्याचा परिणाम तेलाच्या किमतीवर होत आहे. भारताकडे सुमारे १० कोटी पिंप व्यावसायिक कच्च्या तेलाचा साठा आहे. तो ४० ते ४५ दिवसांसाठी काम करू शकतो, अशी माहिती भारत सरकारच्या वतीने देण्यात आली आहे. भारतात सध्या पेट्रोल आणि डिझेलची देशाअंतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी सहा ते आठ आठवड्यापर्यंतचा साठा आहे. भारत सुमारे ८८ टक्के कच्चे तेल आयात करतो. ज्यापैकी ५० टक्क्यांहून अधिक कच्चे तेल पश्चिम आशियातील देशांकडून पुरवले जाते. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून हा साठा भारतात येत असतो. इराणमधील युद्धामुळे येथील जलवाहतूक विस्कळीत झाली आहे. पीटीआयच्या वृत्तानुसार, जहाजांना असलेले विमाकवच काढून घेतल्यामुळे टँकर आणि कंटेनर जहाजे या मार्गावरून वाहतूक करण्याचे टाळत आहेत.

# निवृत्तीनगरातून १.३५ लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

प्रतिनिधी । नवापूर

शहरातील निवृत्ती नगर परिसरात एका शिक्षिकेच्या घरातून अज्ञात चोरट्याने १ लाख ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, चोरटा हा ओळखीचा किंवा नातेवाईक असल्याचे भासवून घरात शिरल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. फिर्यादी लताबाई पंडित सपकाळे (वय ५३, रा. प्लॉट नं. ३४, निवृत्ती नगर, जळगाव) या जिल्हा परिषदेत शिपाई म्हणून कार्यरत आहेत. दि. ३ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारीच्या दरम्यान, त्या कामा निमित्त किंवा अन्य कारणाने व्यस्त असताना, त्यांच्या घरी एक अज्ञात नातेवाईक आला होता. या अज्ञात व्यक्तीने सोन्याचे दागिने लंपास केले. चोरट्याने एकूण मुद्देमाल १,३५,०००/- रुपये लंपास केला आहे.

# जैन इरिगेशनच्या प्रकल्पांमध्ये राष्ट्रीय सुरक्षा दिवस साजरा

प्रतिनिधी । जळगाव

**जैन इरिगेशनच्या विविध प्रकल्पांमध्ये ४ मार्च हा राष्ट्रीय सुरक्षा दिवस व सप्ताह साजरा होत आहे. ही परिषदेची ५५ वी राष्ट्रीय सुरक्षा दिन मोहीम आहे.**

या वर्षी ही मोहिम केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता संपूर्ण आठवडाभर होणार आहे. २०२६ हे वर्ष परिषदेच्या स्थापनेचे हिरकजयंतीचे वर्ष आहे. सहा दशकांचा प्रवास, सहा दशकांची साधना आणि सहा दशकांची सुरक्षा संस्कृती कॉर्पोरेट जगतात विकसीत झालेली आहे. ज्ञतीन ईफम्हणजे एपसरसश, एर्वीलरींश आणि एर्ाुशी यांचा संगम प्रत्येक सहकाऱ्याला सुरक्षिततेबाबत जागरूक, प्रशिक्षित आणि सक्षम बनवतो. त्यामुळे यावर्षाचे घोषवाक्य एपसरसश, Educate Empower People to Enhance Safety हे आहे. यात लोकांचा सहभाग, सातत्यपूर्ण शिक्षण आणि सक्षमीकरण यावर भर देत ही मोहिम समाजात सुरक्षा संस्कृती रुजवण्याचा प्रयत्न करणार आहे.

सहकाऱ्यांशी संवाद साधून त्यांना सहभागी करणे, आवश्यक ज्ञान व कौशल्ये देणे आणि निर्णय घेण्याची ताकद व जबाबदारी देणे यामुळे कार्यस्थळी सुरक्षिततेची भक्कम पायाभरणी होते. कंपनीसाठी सुरक्षितता ही केवळ नियमांची अंमलबजावणी नसून प्रत्येक सहकाऱ्याच्या आरोग्य, आत्मविश्वास आणि सहकार्याला जपणारी गोष्ट आहे. जैन इरिगेशनसारख्या संस्थेत हा कार्यक्रम होत असल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

कारण ही संस्था केवळ उद्योगक्षेत्रापुरती मर्यादित नाही, तर शेतकऱ्यांच्या जीवनाशी, ग्रामीण विकासाशी आणि पर्यावरणाशी निगडित आहे. अशा ठिकाणी सुरक्षा मोहिमेचा प्रारंभ होणे म्हणजे समाजाच्या प्रत्येक घटकाला सुरक्षिततेचा संदेश पोहोचवणे होय. जैन इरिगेशनच्या सर्व प्रकल्पांच्या प्रांगणात जैन इरिगेशनचे संस्थापक श्रद्धेय भवरलालजी जैन यांच्या कार्यकाळापासून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आता कंपनीचे अध्यक्ष अशोक जैन व जैन विस्तारीत परिवाराच्या सदस्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम साजरा करण्यात येत असतो.

# गदडदेव येथे होळी सण मोठ्या उत्साहात साजरा

प्रतिनिधी । शिरपूर

**तालुक्यातील सातपुड्यातील वसलेले गाव गदडदेव येथे मोठ्या उत्सावात होळी सण साजरा करण्यात आला.**

आदिवासी समुहातील अत्यंत महत्वाचा व मुख्य सण म्हणजे होळी. सातपुड्यातील आदिवासी समुहामध्ये या सणाची तयारी माघ पौर्णिमेपासून होळी पूजनाच्या ठिकाणी अर्थात बांबुचा मोठा दांडा ६० ते ९० फुटापर्यंत असतो. तो गाडुन या उत्सवाची सुरुवात होत. हा सण शेतीचक्र, जंगलाशी नाते आणि समुदायीक एकता यांच्याशी जोडलेला आहे. होळी हा हिवाळ्याच्या समाप्तीचा आणि वसंत ऋतूच्या आगमानाचा सण मानला जातो. यात भोंगऱ्या बाजाराला खूप महत्व असते. सुळे व आंबा येथे भोंगऱ्या प्रारंभ झाला. तसेच दहिवद व पनाखेड व कोडीद, बोराडी व लाकड्या हनुमान, सांगवी, वरला भोईटी, पळासनेर, रोहिणी, हाडाखेड तसेच सेंधवा येथे भोंगऱ्या बाजार भरले होते. या उत्सवाचा महादेव दोंडवाडा येथे समारोह झाला. आदिवासी समुहामध्ये या दिवशी वेगळा उत्साह असतो व सारे एकत्र येत होळीची तयारी करण्यासाठी ढोल वाजवत



पारंपरिक गिते गात व नृत्यात दंग होऊन भोंगऱ्यात खरेदी केली. होळीच्या पहिल्या दिवशी टेंबुरणेचे पाच फांद्या टाकतात. दुसऱ्या दिवशी स्त्री- पुरुष पारंपरिक वेशभुषेत सजुन सहकुंटुब उत्सावात सहभागी होतात व तिसऱ्या दिवशी गाव पाटील आणि मानाच्या जोडप्यांच्या हस्ते होळीची पूजा केली जाते व त्यानंतर ३ मार्चला पहाटे ४ वा.दहा एकराला होळी प्रज्वलित केली. होळीच्या भोवती फेर धरत ढोलच्या तालावर आदिवासी नृत्य सादर करत आसतात व नवसपूर्तीसाठी अनेक जन विविध सोंगगेरीया धारण करुन नृत्यात सहभागी होतात. दुर्गम भागात फाग म्हणजे देनगी मागण्याची परंपरा आजही जपली जात असून महिला व पुरुष घरोघर जाऊन फाग मागतात. ही संपुर्ण माहिती आदिवासी नेते आभ्यासक व बिरसा ब्रिगेड जिल्हा सहकार्य अध्यक्ष रोहिदास पाडवी यांनी दिली.

या उत्सावात गाव पोलीस पाटील अनिल पाडवी, गाव पुजारा बाठा पाडवी, डायला सायसिन्ग डावर, गाव वारती, आठ्या पाडवी, गाव कोतवाल अनिल कामाटे, बाबुराव पाडवी, सतिलाल शिंदे, तुळशिराम चौहाण, ग्रामपंचायत सदस्य संग्राम ससत्या, अर्जुन मोते, शांतीलाल पाडवी, रवि शिरसाठ, किलसिंग मोते, दिलवर पाडवी, तिखाराम डावर, दिल्या चौहाण, श्रीबुधा कोळी, आबा महाराज, सादिक पिंजारी, पिंटू भिल, वर्जन ससत्या, लालसिंग वसावे, बन्सी पटले, गुनाज्या भोसले, दिनेश जाधव, यवनाथ भिल, दादाभाऊ भिल, कैलास पाडवी, जयराम पाडवी, तुकाराम पाडवी, ताराचंद ठाकरे, तात्या भिल, श्री. गुलाब पाडवी, डेबरा मोते, वडा वडवी, देविदास चौहान, तिखाराम वडवी, रिस्तम ससत्या, मगन भोसले, शंकर ठाकरे, आत्तरसिंग पाडवी, गुंझार पटले व ग्रामस्थ उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# नवीन सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांचे भूमिपूजन

## नगरसेविका उज्वला बाविस्कर यांचा कामांचा धडाका सुरूच

प्रतिनिधी । जळगाव

**येथील प्रभाग क्रं.२ मध्ये नगरसेविका उज्वला बाविस्कर, नगरसेवक सागर सोनवणे, माजी नगरसेवक किशोर बाविस्कर यांच्या प्रयत्नातून वाणी मंगल कार्यालय परिसरात नवीन सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले.**



जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या वतीने आमदार राजूमामा भोळे यांच्या सहकार्याने, जळगाव शहराचे प्रथम नागरिक तथा महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी यांच्याहस्ते प्रभागातील रस्त्याच्या कामांचा शुभारंभ कुदळ मारून करण्यात आला.

यावेळी प्रभागाचे स्थानिक नगरसेविका उज्वला किशोर बाविस्कर, नगरसेवक सागर शामकांत सोनवणे, माजी नगरसेवक किशोर रमेश बाविस्कर यांच्या प्रयत्नातून श्रीफळ वाहून कामांना सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी नगरसेवक विजय लक्ष्मण बांदल, नगरसेवक निलेश तायडे, विजय जगताप, पारस बाविस्कर, रतिलाल सपकाळे, राजेंद्र कोळी, सुमित पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी व स्थानिक महिला भगिनी तसेच जेष्ठ नागरिक उपस्थित होते.



दरम्यान, वाणी मंगल कार्यालय परिसरात नवीन सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांचे भूमिपूजन नगरसेविका उज्वला बाविस्कर यांनी कामांचा धडाका सुरू केला आहे.

## कोविड योद्ध्यांना न्याय द्या आ.राजूमामा भोळेंना निवेदन

प्रतिनिधी । जळगाव

कोविड महामारीच्या काळात जीव धोक्यात घालून सेवा बजाविलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी न्याय मिळावा, अशी मागणी जनसेवा विचारधारा फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार राजूमामा भोळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी आमदारांनी अधिवेशनात या कंत्राटी कोविड कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर लक्षवेधी प्रश्न उपस्थित करून सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

कोविड महामारीत नागरिकांच्या सुरक्षेसाठी रक्ताचे नातेवाईक देखील घाबरत असताना, कंत्राटी कोविड कर्मचाऱ्यांनी स्वतःची आणि कुटुंबाची पर्वा न करता जीव धोक्यात घालून राज्यभर सेवा बजावली. वेडबॉय, बेड सहाय्यक, डॉक्टर, नर्सेस, म्ब्युलन्स चालक, आया, डेटा एन्ट्री ऑपरेटर अशा विविध पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कोरोना काळात अतुलनीय योगदान दिले, ज्याबद्दल केंद्र व राज्य शासनाने आधी गौरव व सन्मानही केला होता. महामारी शांत झाल्यानंतर अनेक कंत्राटी कोविड कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्यात आले, ज्यामुळे त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात आ. राजूमामा भोळे यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी नलेश बोरा, रमेश वानखेडे, प्रेम वानखेडे, बबन सावळे, विनोद सपकाळे, युवराज सुरवाडे, कृष्णा सावळे, हेमंत बिऱ्हाडे उपस्थित होते.

# धुलिवंदनाच्या दिवशी दोन गटात तुफान हाणामारी

प्रतिनिधी । जळगाव

**मेहरूण परिसरात धुलिवंदनाच्या दिवशी दोन गटात तुफान हाणामारी झाली. मेहरुण परिसरातील साईबाबा मंदिर चौकात जुन्या वादातून ही घटना घडली. त्यानंतर किरकोळ दगडफेक होत दोन जण जखमी झाले आहे. जखमींमध्ये नगरसेवक सुनिल महाजन यांचे बंधू भरत महाजन यांचा समावेश असून त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे.**

मेहरूण परिसरात धुलिवंदनाच्या दिवशी साईबाबा मंदिर चौकात जुन्या वादातून दोन गटात हाणामारीची घटना घडली. त्यानंतर किरकोळ दगडफेक देखील झाली. यात घराच्या गेटची तोडफोडही करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जमावाला पांगविले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता घटनास्थळी पोलिसांनी तात्काळ धाव घेतली होती. एमआयडीसी पोलिस ठाण्याबाहेर दोन्ही गटातील नागरिकांचा जमाव जमल्याने दंगा नियंत्रण पथकही तैनात करण्यात



आले होते. या प्रकरणी पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतले असून, दोन्ही गटांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेत दगडफेक झाली नसून जुन्या वादातून किरकोळ वाद झाला. या वादात दोन जण जखमी झाले असून, त्यापैकी भाजपाचे नगरसेवक सुनील महाजन यांचे बंधू भरत महाजन यांना गंभीर दुखापत झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर आता परिस्थिती नियंत्रणात आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

# सायबर विश्वात वावरताना डिजिटल सजगता हेच प्रभावी सुरक्षा कवच : मुस्तफा मिर्झा

प्रतिनिधी । जळगाव

**सध्याच्या काळात तंत्रज्ञान जितके सोयीचे आहे, तितकेच ते धोकादायकही ठरू शकते. सायबर गुन्हेगार नवनवीन क्लृप्त्या वापरून सर्वसामान्यांची फसवणूक करत आहे. विशेषतः युवतींनी सोशल मीडिया, इंटरनेटचा वापर करताना डिजिटल हायजीन पाळावा. सायबर विश्वात वावरताना तुमची सतर्कता, सजगता हेच तुमचे सर्वात मोठे सुरक्षा कवच आहे,असे प्रतिपादन जळगाव सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मुस्तफा मिर्झा यांनी केले.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागांतर्गत, लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव येथे आत्मनिर्भर युवती अभियान राबविण्यात आले. या अभियानात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राकेश चौधरी होते. व्यासपीठावर महिला विद्यार्थी




विकास अधिकारी प्रा.डॉ.सुनिता चौधरी, प्रा.डॉ.शाम सोनवणे आदी उपस्थित होते. पीएसआय मिर्झा पुढे म्हणाले की, सीबीआय, ईडी किंवा पोलीस अधिकारी असल्याचे भासवून व्हिडिओ कॉलद्वारे घाबरवून पैसे उकळणाऱ्या डिजिटल अरेस्ट या प्रकाराला बळी पडू नका. कोणतेही शासकीय कार्यालय अशा प्रकारे व्हिडिओ कॉलवर कारवाई करत नाही, तसेच डिजिल अरेस्ट ही संकल्पना कायद्यात नमूद नाही. सोशल मीडिया, इन्स्टाग्राम, फेसबुकवर फोटो शेअर करताना लोकेशन टॅगिंग टाळावे आणि अनोळखी व्यक्तींच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नयेत, असा सल्ला त्यांनी दिला. सायबर फसवणूक झाल्यास पहिल्या एक तासात १९३० या हेल्पलाईनवर तक्रार केल्यास फसवणुकीची रक्कम गोठवण्याची शक्यता अधिक असते, याची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. बी.एस.डब्ल्यू.व एम.एस.डब्ल्यूच्या विद्यार्थ्यांनी गावोगावी जाऊन सायबर दूत म्हणून काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. प्राचार्य डॉ. राकेश चौधरी यांनी अध्यक्षीय भाषण केले. प्रा.डॉ. सुनिता चौधरी यांनी अभियानाचा उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन हर्षदा पाटील हिने तर आभार गायत्री असोदेकर यांनी मानले. या प्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. भूषण भामटेराजपूत, प्रा.डॉ. शाम सोनवणे, प्रा.डॉ. यशवंत महाजन, प्रा.डॉ.दीपक महाजन तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

# महिला दिनानिमित्त महिला–मुलींसाठी विशेष क्रीडा स्पर्धा

प्रतिनिधी । जळगाव

**भारतीय क्रीडा प्राधिकरण (युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार) अंतर्गत कार्यरत मेरा युवा भारत केंद्र, जळगाव तसेच जिल्हा क्रीडा कार्यालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने अस्मिता खेलो इंडिया उपक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला व मुलींसाठी विशेष क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे.**

या स्पर्धा दि. ८ मार्च रोजी सकाळी ८ वाजता एकलव्य क्रीडा संकुल, एम. जे. महाविद्यालय, जळगाव येथे पार पडणार आहे. स्पर्धांमध्ये १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावण्याच्या शर्यतींसह विविध मनोरंजक खेळांचा समावेश असून १३ वर्षांखालील, १३ ते १८ वर्षे व १८ वर्षांवरील अशा तीन वयोगटांमध्ये महिला व मुलींसाठी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. प्रत्येक गटातील प्रथम तीन विजेत्या स्पर्धकांना पदके प्रदान करण्यात येणार आहेत. विजेत्यांची माहिती अस्मिता खेलो इंडिया उपक्रमांतर्गत मंत्रालयाकडे अहवाल स्वरूपात सादर करण्यात येणार आहे.सर्व सहभागी स्पर्धकांनी अस्मिता खेलो इंडिया पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक असून स्पर्धेच्या दिवशी सकाळी ७.३० वाजेपूर्वी उपस्थित राहून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये व महिला संघटनांनी आपल्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त महिला व मुलींना या उपक्रमात सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी नोडल अधिकारी निलेश बाविस्कर मो. ७७९८२१२१५९ यांच्याशी संपर्क साधावा.

## दोन आठवड्यानंतर उन्हाची प्रखरता वाढणार

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव जिल्ह्यात पुढील दोन आठवड्यानंतर उष्णतेची लाट सदृश्य स्थिती राहण्याची शक्यता आहे. आजपासून म्हणजे चार मार्चपासून तापमानात वेगाने वाढ होत आहे. उष्ण वाऱ्यांच्या प्रभावामुळे तापमान सामान्यपेक्षा दोन ते तीन अंश जास्त राहील. पहिल्या आणि दुसऱ्या आठवड्यात कमाल तापमान ४२ अंशांपर्यंत पोहोचू शकते. या कालावधीत सकाळच्या वातावरणात सौम्य थंडी राहील,असे वेलनेसचे अभ्यास निलेश गोरे यांनी अंदाज वर्तविला आहे.

## रंग बरसेच्या तालावर थिरकली तरुणाईची पावले...!



**जळगाव** – शहरातील नेहरु चौकाजवळील खान्देश मिल कॉम्पलेक्स परिसरात धुळवडीचा आनंद लुटण्यासाठी युवक–युवती सहभागी झाले होते. तसेच तरुणाईचा उत्साह वाढविण्यासाठी आमदार राजूमामा भोळे यांनी देखील रंगपंचमीच्या सणात सहभागी होऊन रंग बरसेच्या तालावर तरुणाईची पावले थिरकली.

# रस्त्यासह नागरी समस्या तातडीने सोडविल्या जातील

## उपमहापौर मनोज चौधरी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील रस्ते, गटारी बांधकाम, स्वच्छता आदी प्रश्नांबरोबरच नागरी समस्या प्राधान्यक्रमाने सोडविणार असून प्रतिपादन उपमहापौर मनोज चौधरी यांनी केले.**

अजिंठा हाउसिंग सोसायटीतर्फे विद्यमान नगरसेवकांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी उपमहापौर मनोज चौधरी, नगरसेवक डॉ. विरेन खडके, नगरसेवक सुनील खडके, नगरसेवक सुरेश सोनवणे,



नगरसेविका रंजना वानखेडे, नगरसेविका रिटा सपकाळे, नगरसेविका वंदना इंगळे, नगरसेविका अर्चना पाटील यांचा शाल, बुके व संविधानाची प्रत देऊन सत्कार करण्यात आला.अजिंठा सोसायटीतील समस्या सोडविण्यासाठी प्रसंगी आमदार राजूमामा भोळे यांची मदत घेऊ, असे उपमहापौर व उपस्थित सर्व नगरसेवकांनी आपल्या भाषणात सांगितले. संस्थेचे चेअरमन दिलीप सपकाळे यांनी अजिंठा सोसायटीमधील विविध समस्या मांडल्या. सूत्रसंचालन ज्योती भालेराव यांनी तर आभार ममता सपकाळे यांनी मानले. साहित्यिक जयसिंग वाघ, अॅड.आनंद कोचुरे, सेक्रेटरी निलेश सैंदाणे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वितेसाठी संचालक पी.डी.सोनवणे, डॉ. उल्हास तासखेडकर, प्रवीण नन्नवरे, सिद्धार्थ कोचुरे, विजय भालेराव, दीपक साळवे, रवी कोलते, सिंधू तायडे व अॅड. रत्नप्रभा बिऱ्हाडे यांनी परिश्रम घेतले.

# फुकटची सवय समाजाला पंगू बनवतेय : पद्मश्री पोपटराव पवार

## डॉ.आचार्य अविनाशी सेवा पुरस्काराचे वितरण; सह्याद्री फार्मर्स कंपनीला संस्थास्तरीय पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी । जळगाव

**सरकारकडून सध्या सर्व काही फुकट देण्याची प्रवृत्ती वाढत आहे. धान्य फुकट, वीज फुकट यामुळे समाजाची इच्छाशक्ती कमकुवत होत असून ही फुकटची सवय समाजाला पंगू बनवत आहे, असे ठाम मत पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केले.**

जळगाव येथील छत्रपती संभाजीराजे नाट्यमंदिर येथे आयोजित डॉ. आचार्य अविनाशी सेवा पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. हा पुरस्कार सोहळा केशवस्मृती प्रतिष्ठान आणि जळगाव जनता सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, आमच्या



हिवरेबाजार गावात आम्ही कधीच काही फुकट दिले नाही.

लोकसहभाग आणि श्रम यावरच गाव उभे राहिले आहे. आता बजेटमधून पत्त्याचा कॅट आणि दारू द्यायचेच बाकी आहे, असे परखड मत त्यांनी व्यक्त केले. फुकट संस्कृतीमुळे आत्मनिर्भरतेऐवजी परावलंबित्व वाढत असल्याची खंतही त्यांनी यावेळी बोलून दाखवली. ते पुढे म्हणाले की, तापमान बदलामुळे जगासमोर गंभीर संकट उभे राहिले आहे.

माती आणि पाण्याचे प्रदूषण वाढत असून त्याचा थेट परिणाम आरोग्यावर होत आहे. पुढील २५ वर्षांत शेतीसमोरील आव्हाने अधिक गंभीर असतील. त्यामुळे आजच योग्य नियोजन आणि लोकसहभागातून उपाययोजना करणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमात कोल्हापूर येथील अवनी फाउंडेशनच्या कार्यकर्त्या अनुराधा भोसले यांना वैयक्तिक सेवा पुरस्कार, तर नाशिक जिल्ह्यातील मोहाडी येथील सह्याद्री फार्मर्स कंपनीला संस्थास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

### ● केशवस्मृतीने शहर स्वच्छतेचा विडा उचलावा : अनुराधा भोसले

पुरस्कार स्वीकारताना अनुराधा भोसले म्हणाल्या की, केशवस्मृती प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांमध्ये सेवाभाव आणि आत्मीयता दिसते. या संस्थेने आता शहर स्वच्छतेचा विडा उचलावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. शिक्षणाशिवाय समाजपरिवर्तन शक्य नसल्याचे मत त्यांनी यावेळी मांडले.

**शेतीला व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज – विलास शिंदे**

सह्याद्री फार्मर्स कंपनीचे प्रतिनिधी विलास शिंदे यांनी सांगितले की, शेतीत अनेक गुंते निर्माण झाले आहेत. एकट्याने नव्हे तर समूहाच्या ताकदीनेच शेतीत बदल घडवता येतो. शेतीकडे सेवा नव्हे तर व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मनपातर्फे अभय योजना लागू

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील नागरिकांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. नागरिकांकडून वारंवार होणाऱ्या मागणीचा विचार करून जळगाव महानगरपालिकेने मालमत्ता करावरील थकबाकीवर सवलत देण्यासाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना मर्यादित कालावधीसाठी असून, नागरिकांना ५ मार्च ते १९ मार्च या दरम्यान आपल्या मालमत्ता करावरील शास्ती (दंड) माफ करून घेता येणार आहे, अशी माहिती महापौर दीपमाला काळे यांनी दिली आहे.

ही योजना लागू झाल्यामुळे नागरिकांना त्यांच्या थकित करावरील दंडाची रक्कम न भरता केवळ मुळ कर भरून थकबाकीमुक्त होता येणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेने कर भरणा करण्याकरिता विविध डिजिटल पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. यात स्कॅनिंग, नेट बँकिंग, डेबिट, क्रेडिट कार्ड, (फोनपे, गुगल पे इ.) याचा समावेश आहे. शहराच्या विकासासाठी आणि स्वतःवरील थकबाकीचा बोजा कमी करण्यासाठी नागरिकांनी या १५ दिवसांच्या विशेष सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर दीपमाला काळे यांनी केले आहे.

# यावल अभयारण्यातील आदिवासींच्या विस्थापनाला बिरसा ब्रिगेडचा विरोध

## आदिवासी विकास मंत्र्यांना निवेदन; आदिवासींचा लढा तीव्र करण्याचा इशारा

प्रतिनिधी । चोपडा

**‘जळगाव जिल्ह्यात एकूण १५ तालुके आहेत, जिथे जंगल नष्ट झाले आहे तिथे वृक्षारोपणाची आणि अभयारण्याची खरी गरज आहे. मग प्रशासनाने फक्त आदिवासीबहुल गावेच का निवडली?’ असा सवाल विचारत, बिरसा ब्रिगेडने जिल्ह्यातील आदिवासींच्या विस्थापनाच्या विरोधात रणशिंग फुंकले आहे. ‘ना लोकसभा, ना विधानसभा, सर्वात ऊँची ग्रामसभा’ या ब्रीदवाक्यासह आदिवासी समाजाने आपल्या अस्तित्वाची लढाई तीव्र करण्याचा इशारा बिरसा ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष रामदास पावरा यांनी आदिवासी विकास मंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे .**



आदिवासींनी आपल्या जल-जंगल-जमिनीचे पोटच्या पोराप्रमाणे रक्षण केले आहे, म्हणूनच आजही तिथे निसर्ग जिवंत आहे. अशा परिस्थितीत, ज्यांनी जंगल वाचवले त्यांनाच बेघर करण्याचे षडयंत्र शासनाने तात्काळ थांबवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी फक्त चोपडा, रावेर आणि यावलमधील आदिवासी गावेच अभयारण्यासाठी का निवडली? इतर तालुक्यांमध्ये हा प्रकल्प राबवून तिथे वनीकरण का केले जात नाही? या प्रकल्पातून आमची गावे वगळण्यात यावी.

ग्रामसभेच्या परवानगीशिवाय कोणताही प्रकल्प लादणे हा आदिवासींच्या घटनात्मक अधिकारांवर घाला आहे.

पेसा क्षेत्रातील कंत्राटी भरतीचा अन्यायकारक जीआर रद्द करून स्थानिक बेरोजगारांना ८०% आरक्षण देऊन कायमस्वरूपी नियुक्त्या द्याव्यात.

चोपडा येथे भगवान बिरसा मुंडा चौक व भव्य स्मारक उभारण्यासोबतच, शाळा सोडल्याच्या दाखल्यावर हिंदू ऐवजी आदिवासी धर्म आणि मातृभाषा आदिवासी बोली, अशी नोंद करण्याचे स्पष्ट आदेश द्यावेत.

आदिवासी भागातील प्रलंबित सबस्टेशनचे काम पूर्ण करून आदिवासी शेतकऱ्यांना बागायतदार होण्यासाठी मदत करावी, अशी मागणी निवेदनातून केली आहे.

> **आम्ही आमचा हक्क मागत आहोत, भीक नाही! जिल्ह्यातील इतर १५ तालुके व तेथील सर्व सोडून फक्त आमच्याच गावांवर अन्याय का? आम्ही आमचे जंगल आमच्यासाठी आणि भविष्यासाठी वाचवले आहे. तरी देखील अभयारण्याच्या नावाखाली आमच्या जमिनींवर अतिक्रमण करणे हे आमच्या आदिवासी बांधवांवर फार मोठ्या अन्याय केले जात आहे आहे.**
>
> **रामदास भाईदास पावरा**
> **(अध्यक्ष,** बिरसा ब्रिगेड, जिल्हा जळगाव)

## गोजोऱ्यात मुलींसाठी अभ्यासिका केंद्र सुरू

प्रतिनिधी । भुसावळ

येथून जवळच असलेल्या गोजोरा येथे लोकसहभागातून तसेच ग्रामपंचायत व सामाजिक कार्यकर्ते यांच्या माध्यमातून मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. या अभ्यासिकेत गावातील मुलींनी येऊन स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून शासकीय नोकरीत लागून गोजोरा गावाचा गौरव व्हावा ही अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण कोळी यांचा मानस आहे. गावात या आधी मुलांसाठी अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक युवक नोकरीत भरती झाले आहेत. या अभ्यासिकेचे उद्घाटन नुकतेच पुंडलिक तळेले, बबन शेलार, भालचंद्र पाटील (मुंबई) व सरपंच नंदा कोळी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी शालिक पाटील,रामदास दोडे, उपस्थिती होती.

## थोडक्यात

### रावेर येथे थॅलेसिमिया रुग्णांसाठी रक्तदान शिबीर

**रावेर।** येथे थॅलेसिमिया या गंभीर रक्तविकाराने ग्रस्त रुग्णांना नियमित रक्ताची आवश्यकता भासते. याची दखल घेत अनुष्का चौधरी या थॅलेसेमियाबाधित बालिकेचे वडील ज्ञानेश्वर चौधरी व स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत हा उपक्रम राबविला. शिबिरात रेड क्रॉस संस्थेकडून रक्त संकलित करण्यात आले. शिबिरात एकूण २०२ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. नागरिकांनी रक्तदानात सहभाग नोंदविला. दरम्यान डॉ. संदीप पाटील, डॉ. योगिता पाटील, डॉ. दत्तप्रसाद दलाल, नगरसेवक अमोल पाटील, अरुण शिंदे, शैलेंद्र अग्रवाल, उद्योजक दिलीप अग्रवाल, चंद्रकांत चौधरी, चैतन्य महाजन, भूषण महाजन, निलेश पाटील व पदाधिकारी उपस्थित होते.

### कु.म.चौधरी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञानदिन साजरा

**फैजपूर ।** येथील कुसुमताई मधुकरराव चौधरी माध्यमिक विद्यालय येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक बी. एम. बोंडे होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. सी. व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर मुख्याध्यापक बी.एम. बोंडे व डी. के. होले यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व सांगितले. इयत्ता सातवीतील विद्यार्थी जय गुरव याने विज्ञान दिनाविषयी माहिती सादर केली, आठवीतील खुशबू तडवी हिने विज्ञानावर आधारित प्रश्न विचारून सहभाग घेतला. कार्यक्रमास पर्यवेक्षक व्ही. एस. महाजन, ज्येष्ठ शिक्षक एल.जे.बोंडे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन पी.जे. चौधरी यांनी केले.

## घोडगाव जि.प. शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील घोडगाव येथील जि.प.केंद्र शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम ‘कलाविष्कार’ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विजय देवराज व्यवस्थापकीय संचालक (मृद व जलसंधारण विभाग छ.संभाजीनगर), शाळेचे माजी विद्यार्थी विजय ठाकरे () तसेच केंद्रप्रमुख प्रमोद बाविस्कर उपस्थित होते. मान्यवरांनी शाळेची व विद्यार्थ्यांची प्रशंसा केली आम्ही सुद्धा जि.प.चे विद्यार्थी आहोत, असे अभिमानाने सांगितले.

या प्रसंगी उपसरपंच किशोर दुसाने, सदस्य चेतन पाटील, मिनाजबी मन्यार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सोनल धनगर, सर्व सदस्य गण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ‘होता जिवा म्हणून वाचला शिवा’’ हे नाट्य तसेच पुलवामा हत्येत शहीद जवानांना श्रद्धांजली हा भावनिक प्रसंग नाट्य रुपाने सादर करुन बालकलाकारांनी लोकांची मने जिंकली. यावेळी प्रेक्षकांमध्ये भावनीक वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाला महेंद्र पारधी , राजेंद्र धनगर, जगन कुंभार व सर्व शिक्षक वृंद यांनी प्रचंड मेहनत घेतली. प्रास्ताविक जि.प. शाळेचे ग्रेडेड मुख्याध्यापक विलास पाटील यांनी केले व सूत्रसंचालन राजशेखर सोनवणे सरांनी केले. यावेळी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

## एमपीएससी परीक्षेत बालरोग विषयात तरडीचे डॉ.कपिल पाटील राज्यात प्रथम

प्रतिनिधी । शिरपूर

**तरडी (ता. शिरपूर) येथील डॉ. कपिल गोपाल पाटील यांनी लोकसेवा आयोगामार्फत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील सहाय्यक प्राध्यापकपदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत बालरोग विषयात महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला.**



डॉ. कपिल पाटील हे तरडी येथील शेतकरी गोपाल भिका पाटील यांचे सुपुत्र आहेत. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ग्रामीण भागात झाले. त्यानंतर त्यांनी मुंबई येथील पोदार शासकीय महाविद्यालयामधून वैद्यकीय पदवी शिक्षण पूर्ण केले. जयपूर येथे एम.डी. पदवी संपादन केली. त्यानंतर कुरुक्षेत्र येथील शासकीय संस्थेतून पीएच.डी. पदवी प्राप्त केली.डॉ. पाटील यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर मोठी स्वप्ने पाहावीत व ती पूर्ण करावीत, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला आहे.

## वेळोदे येथे टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील वेळोदे येथे श्री छत्रपती ग्रुपच्या वतीने आयोजित भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा २०२६ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. राज्यभरातून तब्बल ३२ संघांनी सहभाग नोंदविल्याने स्पर्धेला मोठा प्रतिसाद लाभला.**



स्पर्धेचा अंतिम सामना अत्यंत रोमहर्षक ठरला. धवली-११ आणि गलंगी-११ या संघांमध्ये झालेल्या सामन्यात धवली-११ संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत गलंगी-११ वर मात केली आणि विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रुपये ५१ हजार अरुण सोनवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. द्वितीय क्रमांकासाठी रुपये २१ हजाराचे बक्षीस संजय बोरसे यांनी दिले. तृतीय क्रमांकाचे ११ हजार १११ रुपयांचे पारितोषिक रेखा बागुल यांच्यातर्फे देण्यात आले. विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक चषक प्रदान करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

## उनपदेव येथे भोंगऱ्या बाजार उत्साहात

प्रतिनिधी । अडावद

**उनपदेव येथे जिल्ह्यातील सर्वात मोठा भोंगऱ्या बाजार उत्साहात पार पडला. लाखोंच्या संख्येने आदिवासी बांधव-भगिनी या यात्रेत सहभागी झाले होते. शेकडो ढोल पथकांच्या सुमधुर नादाने परिसर दुमदुमून गेला होता. पारंपरिक वेशभूषेत सजलेले आदिवासी तरुण-तरुणी ढोलाच्या तालावर नृत्य करताना दिसत होते.**



शरभंग ऋषी पाडा येथे आज दुपारी उत्सवाचा शुभारंभ माजी आमदार लताताई सोनवणे व जळगाव मनपा नगरसेविका डॉ. अमृताताई सोनवणे यांच्या हस्ते भोंगऱ्या देव (बोपदेव) पूजन करून करण्यात आला. यावेळी माजी सरपंच भावना पंढरीनाथ माळी, पोलीस पाटील देवासिंग पावरा, समाजसेवक संजीव शिरसाठ, चंद्रशेखर साळुंखे, गणदास बारेला, सचिन महाजन, हरिष पाटील, मनोहर पाटील, लोकेश काबरा, जावेदखाँ पठाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


**लाखोंची उलाढाल**

वर्षातून एकदाच भरत असलेल्या या बाजारात दाळ्या, फुटाणे, साखरेचे हार, कंगण, जलेबी, फळे, महिलांचे दागिने आदी वस्तूंची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री झाली. टॅटू गोंधणारे, फोटो स्टुडिओ, कुल्फी व शीतपेय विक्रेते, फळविक्रेते यांचीही गर्दी होती.

## विवेकानंद विद्यालयात दुर्गुणांची होळी

प्रतिनिधी । चोपडा

**विवेकानंद विद्यालयातील तंत्रस्नेही कलाशिक्षक राकेश विसपुते यांनी मार्गदर्शन करत कला विषयांतर्गत कल्पकतेला वाव देत एक नवोपक्रम सादर करत विद्यालयात विद्यार्थ्यांकडून दुर्गुणांची होळी साजरी केली.**



यात इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना कला विषयांतर्गत टाकाऊ वह्यांच्या पुठ्ठ्यावर पांढरा कागद चिपकावून त्याला आगीच्या आकाराचे आकार कापून त्यावर आगीसारखे रंगलेपन करून त्यावर आपल्या अंतर्गत असलेला एक दुर्गुण लिहून त्याचे एक होळीचे काल्पनिक मॉडेल तयार करून होळीच्या दिवशी आपल्यातील दुर्गुण कायमचा नष्ट करणे हा हेतू साध्य करत अनोखी होळी साजरी केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.विकास हरताळकर ,घनश्याम अग्रवाल,ॲड. रवींद्र जैन डॉ. विनीत हरताळकर आदींनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## तोरखेडा येथे आजपासून भव्य शिवजन्मोत्सव सोहळा

प्रतिनिधी । तोरखेडा

**येथील हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानतर्फे दि. ५ व ६ मार्च २०२६ रोजी साईबाबा मंदिर परिसरात शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.**



दि. ५ मार्च रोजी सायंकाळी ४ ते ७ वाजेदरम्यान महाराजांच्या पुतळ्याचे तोरखेडा गावात आगमन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कदमबांडे गडी येथून साईबाबा मंदिरापर्यंत हा आगमन सोहळा पार पडणार आहे. त्यानंतर रात्री ८ वाजता गावातील सर्व महिलांच्या हस्ते स्त्री सन्मान सोहळा व आरती होणार आहे. रात्री १२ वाजता महाराजांची महाआरती संपन्न होणार आहे.

दि. ६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता शिवव्याख्यान व कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. ह.भ.प. सतीलाल महाराज म्हसदीकर यांचे कीर्तन होणार आहे. याच दिवशी दुपारी १२ वाजता सप्तनद्यांचे तसेच स्वराज्यातील ५० अभेद्य गड-किल्ल्यांवरील पवित्र जल आणून महाराजांच्या मूर्तीवर जलाभिषेक करण्यात येणार आहे. भारतातील ७ पवित्र नद्यांचे जल आणि गडकिल्ल्यांचे पवित्र पाणी यांचा समावेश या अभिषेकात असणार आहे. सायंकाळी ४ वाजता शिवजन्मोत्सवाचा आनंद सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन हितेश बापू पटोळे, राहुल जाधव (रजि. अध्यक्ष), कल्पेश घोरपडे (अध्यक्ष) व दिलीप गरुड (उपाध्यक्ष) यांनी केले असून, ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे केले आहे.

## विश्व मराठी संमेलनात प्रेरणादायी विचार ग्रंथाचे प्रकाशन

### नाशिक येथे ज्ञानपीठकार डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते सोहळा; साहित्य विश्वातील मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी । नाशिक

**साहित्य नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकमध्ये पार पडलेल्या ‘विश्व मराठी संमेलनात’ प्रेरणादायी साहित्याचा उत्सव रंगला. ख्यातनाम लेखक, जागतिक विक्रमधारक कवी आणि ज्येष्ठ पत्रकार प्रकाश तेली यांच्या ‘प्रेरणादायी विचार’ या १९ व्या ग्रंथाचे प्रकाशन ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात झाले.**



दिमाखदार वातावरण, टाळ्यांचा कडकडाट आणि साहित्यप्रेमींची उपस्थिती यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. या प्रकाशन सोहळ्यास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, माजी आयएएस अधिकारी व भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, माजी अध्यक्ष दिलीप धोंडगे, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. शामकांत देवरे, तसेच भाषा संचालनालयाच्या संचालिका डॉ. मीनाक्षी पाटील आणि अरुण गीते आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला अधिक मानाचे स्थान लाभले. ग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. नेमाडे म्हणाले, ‘प्रेरणादायी विचार’ हा केवळ शब्दांचा संग्रह नसून समाजाला दिशा देणारे वास्तववादी लिखाण आहे. आजच्या अस्थिर काळात सकारात्मकतेची गरज अधिक भासते. प्रकाश तेली यांनी समाजाभिमुख लेखनाची परंपरा सातत्याने जोपासली आहे. त्यांच्या या गौरवोद्गारांनी उपस्थितांना प्रेरणा मिळाली. हा ग्रंथ २५० वास्तववादी आणि जीवनाभिमुख विचारांनी परिपूर्ण आहे. संकटात सापडलेल्या मनाला उभारी देणे, नात्यांमध्ये समजूतदारपणा वाढविणे आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे, हा या पुस्तकाचा गाभा आहे. प्रत्येक घरातील सदस्यासाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. आपल्या मनोगतात प्रकाश तेली यांनी सांगितले की, हा ग्रंथ समाजहित आणि राष्ट्रबांधणीच्या उद्देशाने लिहिला असून, वाचकांच्या जीवनात परिवर्तनाची ठिणगी टाकेल, असा त्यांना विश्वास आहे.

> **वाचकांसाठी खास**
> :
> **तुम्हालाही जीवनात यशाची शिखरे गाठायची असतील आणि नकारात्मकतेवर मात करायची असेल, तर प्रेरणादायी विचार हे पुस्तक तुमच्या संग्रही असायलाच हवे!**

## चोपड्यात विद्यापीठस्तरीय तीन दिवशीय कार्यशाळा

प्रतिनिधी । चोपडा

येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी.पाटील महाविद्यालय व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ ते ७ मार्चदरम्यान तीन दिवसीय विद्यापीठस्तरीय कला गुण कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन दि. ५ मार्च रोजी स्मार्ट हॉल येथे अधिसभा सदस्य प्रा.डॉ. संदिप नेरकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे हे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. संदीप पाटील, डॉ.स्मिता पाटील उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. संजय पाटील, महेंद्र पाटील, बी. के. थोरात विकेश ठाकरे, डॉ. स्वप्निल खरे, डॉ.अजय पाटील, डॉ.आर.एम. बागुल, डॉ. ए. बी. सूर्यवंशी आदी उपस्थित राहणार आहेत.